कुणि भुइचाफा कुणि नभजाई

" कुणि भुइचाफा, कुणि नभजाई
कुणि काटेरी, सदाहरित कुणि,
संजीवक कुणि, कुणी विषारी
सर्वांची एकच वनराई !"

व्हॅल्यू व्हिलेजमधील लॉरा

मंगळवार हा व्हॅल्यू व्हिलेज (व्ही. व्ही.) या दुकानाचा सीनिअर्स डे असतो. म्हणजे त्या दिवशी तिथे पासष्टीच्या वरच्या ग्राहकांना खरेदीमधे चांगली तीस टक्के सूट मिळते. या कारणाने काही किफायतीचे सौदे शोधण्यासाठी मंगळवारी मी तिथे हजेरी लावते. विणकामाची चांगली लोकर, वेताची, किंवा रॅफिया, बांबू, रंगीत गवत वगैरेंची सुंदरसुंदर बास्केटं आणि परड्या, आणि कधीकधी जुनी वाचनीय, दुर्मिळ पुस्तकं, असल्या गोष्टी मला त्या दिवशी तिथे स्वस्त सापडतात. म्हणून ते माझे नित्यनेमाने भेट देण्याचे आवडते ठिकाण झाले आहे. आणि रिचमंडमधील व्ही. व्ही. मधें जाण्याचे दुसरे मोठे आकर्षण म्हणजे तिथे कॅशियर म्हणून काम करणारी लॉरा. आठ वर्षापूर्वी तिला प्रथम पाहिले, तेव्हापासून ती लक्षात राहिली, याचे मुख्य कारण म्हणजे तिचे रोजचे अफलातून कपडे आणि त्या कॅश रजिस्टरवर काम करतानाचा तिचा एकंदर त्या संस्थानाची आपण राणीच असल्याचा अजोड आविर्भाव.

एक तर, ती काम जिथे करते, ते ठिकाण म्हणजे तद्दन जुना बाजार. आपण तिथे जातो, हे सांगायलादेखील उच्चभ्रू लोकांना लाज वाटणार. तिथे विकला जाणारा जुना, वापरलेला माल, वापरलेल्या कपड्यांच्या, बुटांच्या, पर्सेसच्या आणि घरसजावटीच्या वस्तूंच्या शेल्फांच्या रांगाच्या रांगा, त्यात तिथे येणारे, स्वस्तात स्वस्त माल शोधणारे पुष्कळसे गबाळे किंवा गरीब, बेकार लोक, किंवा अंगाखांद्यावर गोंदण मिरवणारे विक्षिप्त अवलिया, आणि सेल्स–कॅश काउंटरवरील या लॉराचे लक्षवेधक चकचकीत कपडे आणि रुबाब यांच्यामधे मला एक भलतीच विसंगती जाणवली, म्हणून प्रथम तिच्याकडे लक्ष वेधले गेले. सर्वसाधारणपणे जुन्या बाजाराच्या गल्ल्यावरच्या कॅशियर्समधे दिसणारा गबाळग्रंथीपणा, किंवा ढिसाळपणा लॉराजवळ अजिबात नसे. ती चटपटीत, तरतरीत तर होतीच, पण शिवाय ती कायम अफलातून वेषभूषा आणि केशभूषा करून कामाला येत असे. समोर आलेल्या गिऱ्हाइकाशी ती नेहमीच आपल्या आर्जवी आवाजात 'हनी' आणि 'स्वीटहार्ट' वगैरे संबोधने वापरून बोलणार, मग तो ऐंशीच्या वरचा म्हातारा असो, की सातआठ वर्षाचा पोरगा. चष्म्यामागचे तल्लख डोळे चांगले काळ्या पेन्सिलने रेखलेले, आणि कधी कधी पापण्याही लाल नाहीतर जांभळ्या रंगवलेल्या. पण त्या डोळ्यांतून एक सज्जनपणा, आणि गंमतीदारपणा नेहमीच दिसायचा. डोक्यावरच्या केसांचा रंगही नेहमीच सरड्याच्या अंगासारखा बदलायचा, आज रेशमाच्या लडीसारखा सोनेरी तर उद्या वाळक्या गवतासारखा पांढुरका, तर परवा कोंबड्याच्या तुऱ्यासारखा तांबडा, आणि कधी, चक्क जांभळा नाहीतर हिरवा. सडक केसांची, कुरळ्या केसांचीअशी तऱ्हतऱ्हेची विग्ज तिच्या संग्रही असावीत. दुकानात गेल्यावर तिच्याकडे नजर गेलीच पाहिजे, आणि शिवाय खिळूनही राहिली पाहिजे, असे कपडे. अगदी असोशीने निवडलेले अत्यंत वेगळ्या स्टाइलचे. पायातल्या बुटांपासून डोक्यावरच्या विगपर्यंत सगळे एकमेकांशी जुळणारे. कधी सगळेच्या सगळे बगळ्यासारखे नुसते पांढरेशुभ्र. तर कधी डोळे दुखतील एवढ्या सायकेडेलिक रंगांचे. कधी पारदर्शक जाळीचे, कधी धातू कपड्यांना जोडून घडवलेले, तर कधी मौल्यवान खडे जडवलेले. कधी काव्बॉय स्टाइलचे, तर कधी डॉली पार्टनच्या स्टाइलचे. त्या त्या कपड्यांना साजेसे मोजके किंवा गळाभर दागिनेही घातलेले असायचे. बहुतेक सगळे दागिने कॉस्च्यूम ज्युवेलरी म्हणावे तसे, पण तरी लक्षवेधक आणि निवडक. मला तिचा हा स्वच्छंदी नटवा आविर्भाव चित्तवेधक वाटायचा. कॅश रजिस्टरवरच्या रोजच्या रुक्ष, कंटाळवाण्या कामाला तिने शतरंगी करून सोडले होते. तिच्या कपड्यांना, दागिन्यांना छान म्हटलं, की ती हसून कौतुकाचा स्वीकार करायची, आणि लगेच कामाला लागायची. म्हणजे या नटवेपणाचाही फार बडेजाव नसे. मधूनमधून मी तिच्या काही पोषाखांमधे तिचे फोटो घेतले. तिने आनंदाने पोझेस दिल्या.

हळूहळू तिच्याबद्दल बरंच काही कळत गेलं. ती कॅलगरीमधे जन्मली पण व्हँकूव्हरमधेच वाढली. इथेच तिचं हायस्कूलपर्यंतचं शिक्षण झालं. वयाच्या आठव्या वर्षापासून आईवडिलांच्या रेस्टराँमधे तिने काम केलं. प्राथमिक शाळेत असताना तिच्या आईच्या प्रोत्साहनामुळे ती बॅले शिकायची. अगदी लहानपणापासून चौदा वर्षांपर्यंत तिने बॅलेचा पाठपुरावा केला, आणि विनिपेगच्या रॉयल विनिपेग बॅले या संस्थेत तिला पुढे शिकायला स्कॉलरशिपही मिळाली होती. पण लॉरा म्हणे, "मला माझं अख्खं आयुष्य बॅलेमधे घालवायचं नव्हतं, म्हणून मी काही तिथे गेले नाही!" पण बॅले बघायची आवड मात्र तिने आयुष्यभर जोपासली. "माझ्या रशियन मुलाबरोबर मी मॉस्कोमधे जाऊन बॉल्शॉय बॅले बघितला, आणि शिवाय क्रेमलिनमधे होणारे बॅलेही पाच दिवस ओळीने बघितले. त्यात 'स्वान लेक' सुद्धा बघितला, अगदी चौथ्या ओळीत बसून." असं तिने मला एकदा सांगितलं. मी हे ऐकताच पहिल्याच ओळीवर ठेचकाळले. "रशियन मुलाबरोबर?" मी विचारलं. ती हसून म्हणाली, "अगं, मला तीन रशियन मुलगे आहेत, एक जर्मन मुलगा आहे, आणि एक ब्राझीलमधला मुलगा आहे." मी अवाक्. कारण तिची एकच मुलगी तान्या नावाची आहे, आणि ती फ्लॉरिडात राहते हे मला माहित होतं. लॉराला नवराही एकच होता. मग ही मुलं कुठली? दत्तक घेतलेली की बाकीच्या देशात दानावर पोसलेली?

तर कळलं, की हे तिचे 'इंटरनेट मुलगे' किंवा 'बॅकगामन मुलगे'. तिला इंटरनेटवर पोकर आणि बॅकगामन खेळायचा छंद आहे. त्यावेळी तिला काही तरुण मुलगे खेळगडी म्हणून भेटले. ते तिला मॉमी म्हणत, म्हणून तीही त्यांना आपले मुलगे मानू लागली. अशी ही खेळातून जन्मलेली मैत्री इंटरनेटवरच वाढली, आणि नंतर हळूहळू ते सगळे (म्हणजे रशियातील तिघे, आणि जर्मन मुलगाही) इथे कॅनडात येऊन तिला भेटून गेले, आणि तीही रशियामधे सर्गेइ आणि एलिया या तिच्या मानलेल्या मुलांसाठी दोनदा जाऊन आली. फक्त ब्राझीलमधला मुलगा अजून प्रत्यक्ष भेटलेला नाही, म्हणाली. या संभाषणामुळे "माझे 'इंटरनेट मुलगे' किंवा माझे 'बॅकगामन मुलगे'" या आजच्या जगातील नव्या नात्याचा अर्थ मला कळला, आणि बॅलेच्या तिच्या अभ्यास व आवडीबद्दल कळल्यावर, तिच्या व्यक्तिमत्वात तो सहजसुंदर डौल का दिसतो, याचाही उलगडा मला झाला.

तू केव्हापासून हे असे जडावाचे आणि तऱ्हतऱ्हेचे लक्षवेधक पोषाख घालतेस, असं मी तिला विचारलं. ती म्हणाली, आयुष्यभर रेस्टराँच्या धंद्यात वेट्रेसचं काम करताना असे रंगीबेरंगी कपडे घालायला मिळत नसत, कारण तिथे नेहमीच काळा स्कर्ट आणि पांढरा शर्ट असेच कपडे घालायचा प्रघात होता. पण आठ वर्षापूर्वी एका अपघातात तिची कंबर मोडली, आणि मग फार चालायला नको, म्हणून तिने रेस्टराँचे काम सोडून घराजवळच्याच व्हॅल्यू व्हिलेजमधे काम घेतलं. त्यामुळे ती एका जागी उभं राहून कॅशियरचे काम करू लागली, तिथे तिला रंगीबेरंगी कपडे आणि दागदागिने घालण्याची हौस भागवायला मिळाली. कारण या दुकानात कामकऱ्यांनी हवे ते कपडे घातलेले चालत असत. मग गेल्या सात–आठ वर्षात तिने भरपूर तऱ्हतऱ्हेचे पोषाख जमवले आणि कामावर वापरले. त्या त्या दिवसाच्या महत्त्वाप्रमाणे, किंवा तिच्या मूडप्रमाणे ती आपले पोषाख निवडते. आणि दुकानात येणाऱ्या गिऱ्हाइकांना तिचा जामानिमा पाहात राहताना आपण रांगेत अडकलो आहोत, याचा कधीही त्रास होत नाही. एकदा तिने मला हे सगळे पोषाख, दागिने बघायला आपल्या घरी बोलावले.

तिचं घर म्हणजे एक दुसऱ्या मजल्यावरचं दोनतीन खोल्यांचे अपार्टमेंट. त्यात ती, तिचा पेंटिंग करण्याची हौस असलेला नवरा टेरी, आणि टिना आणि कोको ही तिची दोन सयामी मांजरं, राहतात. एका खोलीत दोन भलेमोठे संगणक आहेत, आणि त्यावर लॉरा आणि टेरी आपापले काम करताना चक्क चाकांच्या खुर्च्यांवर (खऱ्याखुऱ्या व्हीलचेअरवर) बसतात. बाकी सगळ्या खोल्यांतून तीनचार क्लॉझेट्स्मधे तिचे पोषाख लटकले आहेत, आणि जागोजागी लटकावलेले बुटांचे अगणित जोड, आणि मुलांमांजरांची चित्रं यांनी क्लॉझेटांची दारं, भिंती भरून गेलेल्या आहेत. नवऱ्याने काढलेली काही बक्षीस मिळवलेली जहाजाची चित्रं फ्रेममधे लावली आहेत. पण बाथरूममधेदेखील सगळ्या भिंतींवर ज्वालामुखी, समुद्र, जलचर, वनचर आणि मानव यांची गमतीदार चित्रं त्याने काढून ठेवली आहेत. बाकी सर्वत्र, नजर जाईल तिथे कितीक विग्ज, किती दागदागिने आणि किती कपडे!

तिच्या घरातल्या तिच्या ड्रेसरवर हरतऱ्हेच्या हँगरवर माळा, अंगठ्या, ब्रोचेस वगैरे लटकावलेले दिसतात, शिवाय ड्रेसरचे खणही त्यांनी भरून गेलेत. ऑस्ट्रीयन क्रिस्टल आणि ऱ्हाइनस्टोन्स या खड्यांच्या दागिन्यांचा तिला भरपूर षौक आहे. शिवाय स्वत: शिवून आपले अनेक पोषाख तिने तयार केलेले आहेत. अशा एका स्वकृत काळ्या जॅकेटाला तिने २४३० बारीकबारीक आणि मध्यम आकाराचे ऱ्हाइनस्टोन्स स्वत: जडवले आहेत, असं तिने मला सांगितलं. तुरीच्या डाळीएवढा मध्यम आकाराचा खडा, आणि मुगाच्या डाळीएवढा बारीक खडा. प्रत्येक खडा जडवायला खालून त्याचा काटा कापडात खुपसून ठेवायचा, मग वरून दुसऱ्या हाताने खडा त्यात बसवायचा, आणि चारी बाजूंनी त्याच्या कडांच्या पाकळ्या दाबून घट्ट करायच्या ही जडावाची प्रक्रिया. ती म्हणाली की हे जडावाचं अत्यंत किचकट हाती काम करायला तिला एकूण दोन वर्ष लागली. या तिच्या चिकाटीचं कौतुक वाटलं मला. हे जॅकेट घालून तिचा एक फोटो मी तिच्या घरातच काढला.

अलिकडे लॉरा व्ही. व्ही. मधे दिसेनाशी झाली. बाकीच्या कामकऱ्यांकडून कळलं, की तिला सुपरवायझरने बॅकरुममधे काम करायला लावलं, म्हणून तिने काम सोडलं. मी हळहळले, कारण लॉराच्या कल्पक आणि नेत्रदीपक वेषभूषेला बघणं, हे व्ही. व्ही. मधे जाण्याचं एक प्रमुख आकर्षण होतं. काही दिवसांनंतर ती व्ही. व्ही. च्या अगदी शेजारीच असलेल्या दुसऱ्या छोट्या दुकानात काम करताना दिसली. हे दुकान रिचमंड अँनिमल प्रोटेक्शन सोसायटीचं थ्रिफ्ट अँड अँटीक स्टोअर होतं, आणि माझी मुलगीदेखील तिथे काही वर्षं सेवाभावी काम करीत असे. तिथे माझ्या गार्डन क्लबातल्या मैत्रिणीही काम करायच्या, तेव्हा त्यांना भेटायला कधीकधी तिथेही मी हजेरी लावायची. माझ्याकडच्या ज्यादा झालेल्या प्लास्टिकच्या पिशव्या त्यांना वापरायला नेऊन द्यायची. लॉराला तिथल्या कॅश काउंटरवर पाहून छान वाटलं. लॉराचे कपडे अजूनही तसेच नेत्रवेधक होते. पण त्या छोट्याशा दुकानात कमी जागेत भरपूर वर्दळ असल्याने तिच्याशी फारसं बोलता येत नसे. एकीकडे शेजारच्या मोठ्ठाल्या व्ही. व्ही. मधे आता लॉरा जरी कामावर नसली, तरी लॉराचा आवाज अजूनही ऐकायला यायचा. कारण तिच्या गोड आवाजात रेकॉर्ड केलेल्या घोषणा ते नित्यनेमाने मधुनमधून तिथे वाजवायचे. "To you, it's a shopping cart. But to a child it can be a rocket or a space ship. Creative? certainly. But safe? Not really!!! So please don't leave a chile unattended in the cart". अशी छानशी घोषणा तिच्या आवाजात ऐकायला आली, की अजूनही ती तिथेच आहे, असा भास व्हायचा. आणि एक दिवस तीच स्वत: व्ही. व्ही. मधे आलेली दिसली. कॅश काउंटरवर उभी राहून त्यांच्या स्पेशल सेलची ती जाहिरात करीत होती. त्यांनंतर मी तिला गाठले, आणि म्हटले, "अगं, तू इथे काय करते आहेस?" त्यावर ती म्हणाली, "मी अजूनही येते इथे मधुनमधून, जुन्या लोकांना भेटायला आणि आले, की त्यांच्यासाठी घोषणाही करते सिस्टीमवरुन." मग काम का सोडलंस इथलं असं विचारल्यावर ती सहज म्हणाली, "अगं, मी निवृत्त झाले! आता फक्त सेवाभावी काम करते शेजारी." मला हाही तिचा स्वभाव छान वाटला. म्हणजे दुकानात काम करणं सोडलं, पण त्यावर प्रेम करणं सोडलं नाही तिने. नो हार्ड फीलिंग्ज्! ती म्हणते "Honey, we are here for a short time. I try and spread the cheer as much as I can." किती साधं तत्त्वज्ञान! आनंद द्या, आनंद घ्या! व्ही. व्ही.मधे असो, नाहीतर शेजारच्या दुकानात असो, ही सौंदर्योपासक कलावती आणि खेळकर लॉरा रोज नवनवे, सुंदरसुंदर पोषाख घालत तिचं आनंदव्रत पाळीत असते. बहुरत्ना वसुंधरा!

- विद्युल्लेखा अकलूजकर

(रिचमंड, ब्रिटिश कलम्बिया, कॅनडा)